स्थायी समितीच्या **गुरुवार दिनांक 16–07–2015** रोजी **सायंकाळी 05–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | **मा. श्री. रमेश माणिकराव सिंगारे** | **सभापती** |
| 2. | मा. श्री. शरद महादेवराव बांते | सदस्य |
| 3. | मा. श्री. संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य |
| 4. | मा. श्री. श्रावण तुकाराम खापेकर | सदस्य |
| 5. | मा. श्री. गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य |
| 6. | मा. श्री. जगतराम सेवकराम सिन्हा | सदस्य |
| 7. | मा. श्री. मो. कामील अंसारी | सदस्य |
| 8. | मा. श्री. किशोर चिंधुजी गजभिये | सदस्य |
| 9. | मा. सौ. निता राजेंद्र ठाकरे | सदस्या |
| 10. | मा. श्री. किशोर रामाजी डोरले | सदस्य |
| 11. | मा. सौ. विशाखा विकास मैंद | सदस्या |
| 12. | मा. श्रीमती प्रेरणा बळीराम कापसे | सदस्या |
| 13. | मा. सौ. सरस्वती विजय सलामे | सदस्या |
| 14. | मा. श्री. संदिप प्रल्हाद सहारे | सदस्य |
| 15. | मा. श्री. दिपक मोहन पटेल | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. सौ. कांता राधेश्याम रारोकर | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. आर.झेड. सिद्दीकी, उपायुक्त
2. श्री. हरीष दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 118:— मौजा – बोरगाव, खसरा क्र. 151/1, 157/2, 58/3, 59/1, 59/2, 54/2 आणि 55 या मंजुर अभिन्यासातील खुल्या जागेवरील क्रिडांगनाचे नामविधान वगळण्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 अंतर्गत फेरबदलाचा प्रस्ताव तसेच

संदर्भ :— मा. राज्य मंत्री डॉ. रणजीत पाटील नगर विकास महाराष्ट्र राज्य यांचे दि. 24/04/2015 चे निर्णय.

मौजा – बोरगाव, खसरा क्र. 151/1, 157/2, 58/3, 59/1, 59/2, 54/2 आणि 55 च्या मंजुर अभिन्यासातील भुखंड क्र. 47 ते 51 च्या दक्षिणेकडील 1289.48 चौ.मी. खुल्या जागेतील क्रिडांगणाचे नामविधान महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 अंतर्गत मा. राज्यमंत्री डॉ. रणजीत पाटील नगर विकास महाराष्ट्र राज्य यांचे दि. 24/04/2015 निर्णयानुसार वगळुन ठरावांकित जागा ही विकास योजनेत मंजुर अभिन्यासाप्रमाणे प्रस्तावित करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 119</u>:— स्थायी समिति ठराव क्र. 165 दिनांक 31/12/2012 अन्वये नागपूर महानगरपालिकेतील मा. पदाधिकारी, विविध विभाग प्रमुख, सहा. आयुक्त/वार्ड अधिकारी यांना कार्यालयीन कामाकरिता देण्यात आलेल्या ( Taxi permit, Tata Indica, Tata Indigo, Maruti Van & Auto Rickshaw with Loud speaker) खाजगी चार चाकी वाहनांची मुदत दिनांक 06/01/2015 ला संपुष्टात आलेली असल्याने नविन निवीदा होवून कार्यादेश होईपर्यंत मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव व नविन निवीदा बोलविण्यास्तव प्रस्ताव स्थायी समितीच्या मान्यतेस्तव ठेवण्यात आला होता.

त्यानुसार, स्थायी समिति ठराव क्र. 381 दि. 15.12.2014 अन्वये सन (सन 2015–2016 ते 2016–2017) या दोन वर्षाकरिता भाडेतत्वावर दर निश्चितीसाठी नविन निवीदा प्रक्रीया करण्यास्तव प्रशासकीय मंजुरी देण्यात आली असता, निवीदा प्रक्रिया करण्यात आली असून खालीलप्रमाणे दर प्राप्त झालेत.

| अ.क. | वाहनाचा प्रकार | अस्तित्वात असलेले निवीदा दर प्रति माह | निवीदेतील आर्थीक दर पत्रकात भरलेले दर प्रति माह | प्रत्यक्ष वाटाघाटीनुसार सुधारीत दर प्रति माह (1500 किमी) |
|---|---|---|---|---|
| 1 | मारोती व्हॅन | 15840/– | 19900/– | 18000/– |
| 2 | टाटा इंडिका | 19800/– | 29900/– | 24000/– |
| 3 | टाटा इंडिगो | 19800/– | 35251/– | 28000/– |
| 4 | ऑटो रिक्षा | 21600/– | 24000/– | 23000/– |

अतिरीक्त तास व अतिरिक्त किमी. चे दर

| अ.क. | वाहनाचा प्रकार | अस्तित्वात असलेले दर | | प्रत्यक्ष वाटाघाटीनंतरचे दर | |
|---|---|---|---|---|---|
| | | अति. किमी. | अति. तास | अति. किमी. | अति. तास |
| 1 | **मारोती व्हॅन** | **6/–** | **45/–** | **08/–** | **85/–** |
| 2 | **टाटा इंडिका** | **7/–** | **50/–** | **10/–** | **100/–** |
| 3 | **टाटा इंडिगो** | **08/–** | **60/–** | **13/–** | **110/–** |

उपरोक्त वाहनांचे दर मासिक दर असून अंदाजित सरासरी मासिक रू. 2000/– इतका अतिकालीक भत्ता व अतिरिक्त किमी. साठी खर्च येत असतो.

हे लक्षात घेता सध्याचे इंडिका वाहनांचे अंदाजित सरासरी दर रू. 26,000/– इतके होतील, करिता, यापुर्वी ज्याप्रमाणे मनपाचे अधिका–यांना स्वतःचे वाहन वापरण्याची परवानगी देण्यात आली होती, त्याच धर्तीवर जे पदाधिकारी, झोन सभापती व अधिकारी ज्यांना सध्या वाहन अनुज्ञेय केले आहे व जे स्वतःचे खाजगी वाहन कार्यालयीन कामाकरिता वापरण्यास

इच्छुक आहे, त्यांचे खाजगी वाहन कार्यालयीन कामास्तव रू. 20,000/– प्रति माह एकमुश्त रकमेवर वापरण्याची मंजुरीस्तव व जानेवारी 2015 ते वरील कार्यादेश होईपर्यंत जुन्याच दराने वापरण्यात आलेल्या दरांना मंजुरी देणे व मा. पदाधिकारी व अधिका–यांना स्वतःचे वाहन वापरण्यास्तव मंजुरी झाल्यास ती वाहने वगळून आवश्यकतेनुसार इतर आवश्यक वाहनांचे दर मासिक 1500 कि.मी पर्यंत उपरोक्त तक्त्यांनुसार मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन स्थायी समिती ठराव क्र. 165 दि. 31.12.2012 प्रमाणे ज्या कंत्राटास मंजुरी प्रदान करण्यात आली त्यास जुन्याच दराप्रमाणे (दिनांक 06.01.2015 ते 06.01. 2016) एक वर्षाकरीता मुदतवाढ देण्यास एकमताने मंजुरी, तसेच कार्यालयाने सादर केलेल्या प्रस्तावाचे निविदा मंजुरी व पदाधिकारी व अधिकाऱ्यांना स्वतःचे वाहन वापरण्याचे दोन वेगवेगळे प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजूरी करीता स्वतंत्र पणे लवकरात लवकर पाठविण्यात यावे. नव्याने निविदेचा प्रस्ताव ज्या वेळेस स्थायी समिती मंजूरी प्रदान करेल, त्या वेळे पासुन दिलेली मुदतवाढ संपुष्टांत येईल या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 120</u>:— नागपूर म.न.पा.च्या दहा झोन अंतर्गत मालमत्ता कराची देयके वितरीत करण्याच्या कामाचे दर व एजन्सी निश्चित करण्याकरीता निविदा बोलविण्यात आल्या असता प्राप्त निविदा संदर्भात खालील प्रस्तावास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न तसेच,

1) निविदेमध्ये प्राप्त निम्नतम दर रू. 5.50 प्रति देयक यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
2) या निम्नतम दरानुसार मालमत्ता कराची दहा झोनची मागणी देयके वाटपाच्या एकूण रू. 2832500/– च्या खर्चास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
3) या निम्नतम दरांवर जे निविदाकार अथवा अन्य एजन्सी काम करण्यास इच्छुक असतील त्यांचेकडून आवश्यकतेनुसार निविदा शर्तीच्या अधिन काम करवून घेण्यास अनुमती देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली..

<u>ठराव क्रमांक 121</u>:— नागपूर शहराकरीता मंजुर विकास योजनेतील मौजा – गोरेवाडा, ख.क्र. 35/11 (जुना 35/4) मधील श्री. गणेश बिल्डर्स लि. नागपूर, तर्फे श्री. पहिलाज जगुमल सच्चानी, 2) मे. गणेश इस्टेट नागपूर तर्फे श्री. ओमप्रकाश जगुमल सच्चानी, 3) मे. साईनाथ फायनान्स कॉर्पोरेशन तर्फे श्री. विजय किंमतराय रामानी, यांच्या मालकीच्या 0.81 हे.आर. (8100.00 चौ.मी.) जमीन विकास योजनेतील आरक्षण क्र.एन.एम.डब्लु–129 ''कॅटल स्टेबल ॲन्ड डेअरी फार्म'' अंतर्गत संपादन करण्यास्तव आवश्यक रू. 95,58,000/– च्या राशीची तरतुद उपलब्ध करून देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन अर्जदारा सोबत सक्षम अधिकाऱ्याने संपादन करण्यास्तव आवश्यक राशी संदर्भात वाटाघाटी करावी व त्यानंतर जिल्हाधिकारी मार्फत भुसंपादन कार्यवाही करावी या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 122</u>:— नागपूर शहराकरीता मंजुर विकास योजनेतील मौजा – गोरेवाडा, ख.क्र. 33/6 (जुना 33/2) मधील हॅपी होम को. ऑपरेटिव्ह हॉ. सोसायटी लिमीटेड तर्फे अध्यक्ष श्री. ओमप्रकाश जग्गुमल सच्चानी यांच्या मालकीच्या 0.41 हे.आर. (4100.00 चौ.मी.) जमीन विकास योजनेतील आरक्षण क्र.एन.एम.डब्लु–129 ''कॅटल स्टेबल ॲन्ड डेअरी फार्म'' अंतर्गत संपादन करण्यास्तव आवश्यक रू. 48,38,000/– च्या राशीची तरतुद उपलब्ध करून देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन अर्जदारा सोबत सक्षम अधिकाऱ्याने संपादन करण्यास्तव आवश्यक राशी संदर्भात वाटाघाटी करावी व त्यानंतर जिल्हाधिकारी मार्फत भुसंपादन कार्यवाही करावी या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 123</u>:— नागपूर शहराकरीता मंजुर विकास योजनेतील मौजा – गोरेवाडा, ख.क्र. 27/3 मधील श्री. गणेश बिल्डर्स लि. तर्फे पहिलाज जग्गुमल सच्चानी यांच्या मालकीच्या 0.39 हे.आर. (3900.00 चौ.मी.) जमीन विकास योजनेतील आरक्षण क्र.एन.एम.डब्लु–129 ''कॅटल स्टेबल ॲन्ड डेअरी फार्म'' अंतर्गत संपादन करण्यास्तव आवश्यक रू. 46,02,000/– च्या राशीची तरतुद उपलब्ध करून देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन अर्जदारा सोबत सक्षम अधिकाऱ्याने संपादन करण्यास्तव आवश्यक राशी संदर्भात वाटाघाटी करावी व त्यानंतर जिल्हाधिकारी मार्फत भुसंपादन कार्यवाही करावी या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 124</u>:— स्थानिक संस्था कर विभागातील विविध जकात नाक्यांवरी भंगार सामानाची विल्हेवाट लावण्याबाबत1 एप्रिल, 2013 पासून स्थानिक संस्था कर प्रणाली सुरू झाल्यानंरत मनपाचे पूर्वी अस्तित्वात असलेले विविध जकात नाके बंद झालेले आहे. या जकात नाक्यांवर बऱ्याच कालावधीपासून विविध प्रकारचे भंगार झालेले साहित्य जसे लोखंडी आलमाऱ्या, तुटलेल्या खुर्च्या, कुलर्स, लोखंडी ॲगल्स, टेबल, पिण्याचे मशीन्स इ. जमा करून जकाम नाक्याचे नाका नं. 8, 9, 10, 11(ब) येथील गोडावून मध्ये ठेवण्यात आलेले आहे. या भंगार सामानाची विल्हेवाट लावण्याचे दृष्टीने पंजीकृत व्हॅल्युअर मे. चांडक यांचेकडून अंदाजित मुलयांकन करून घेण्यात आलेले आहे. या भंगार सामानाची लिलावाद्वारे अथवा निविदा मागवून विल्हेवाट लावण्यास्तव रितसर प्रक्रिया पार पाडून करण्याच्या प्रस्तावास मा. स्थायी समितीची मंजूरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन निविदा मागविण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 125** :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर